ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

# जैन तत्त्वज्ञानातील नय संकल्पना आणि आचार्य कुंदकुंद यांचे योगदान

*** सुप्रिया चिं. देशमुख,**

** संशोधक विद्यार्थी ,मुंबई विद्यापीठ ,मुंबई*

**सारांश**

*जैन तत्त्वज्ञानाप्रमाणे ज्ञान हे प्रमाण आणि नय या दोहोंमुळे होते. पारंपारिक जैन दर्शनामध्ये द्रव्यार्थिक आणि पर्यायार्थिक नय असे दोन प्रकारचे नय सर्वज्ञात आहेत. द्रव्यार्थिक नयाप्रमाणे वस्तू नित्य आहे आणि पर्यायार्थिक नयाप्रमाणे वस्तू परिवर्तनशील आहे. आचार्य कुंदकुंद यांनी जीवाचे वर्णन करण्यासाठी निश्चय आणि व्यवहार नय या आणखी एका प्रकारच्या नयाचा अवलंब केला. निश्चय नयाप्रमाणे जीव अबद्ध आहे आणि व्यवहार नयाप्रमाणे बद्ध आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये आचार्य कुंदकुंद यांच्या नयांची सखोल मीमांसा केली आहे तसेच जैन तत्त्वज्ञानातील त्यांचे योगदान स्पष्ट केले आहे.*

***महत्त्वाचे शब्द :****नय, निश्चय-नय, व्यवहार-नय, जीव, बंध, मोक्ष, पक्षातिक्रांत*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**प्रस्तावना:**

जैन तत्त्वज्ञानात नय ही एक महत्त्वाची संकल्पना आहे. जैन ज्ञानमीमांसेप्रमाणे नय हे ज्ञानप्राप्तीचे एक माध्यम आहे. तत्त्वार्थसूत्राप्रमाणे प्रमाण आणि नय या दोहोंमुळे ज्ञानप्राप्ती होते असे सांगितले आहे (तत्त्वार्थसूत्र, अध्याय १, सूत्र ६). प्रस्तुत शोधनिबंधामध्ये नय या संकल्पनेचा विचार पुढीलप्रमाणे केला आहे.

निबंध तीन भागामध्ये विभागला आहे. पहिल्या भागात नयाच्या ज्ञानशास्त्रीय भूमिकेबद्दल विशेष चर्चा केली आहे. दुसऱ्या भागात आचार्य कुंद्कुंद यांच्या ग्रंथांमधील नय विचार याची चर्चा केली आहे. तिसऱ्या भागात आचार्य कुंद्कुंद यांचे योगदान स्पष्ट केले आहे.

नय म्हणजे दृष्टीकोण. ज्ञान प्रमाणाद्वारा प्राप्त होते असे सर्वच दर्शने मानतात. जर प्रमाणाने यथार्थ ज्ञान प्राप्त होऊ शकते तर प्रमाणाबरोबर नयाचा उपयोग जैन दर्शनामध्ये कसा आवश्यक आहे याचा ऊहापोह प्रस्तुत निबंधाच्या पहिल्या भागात केला आहे.

आचार्य कुंद्कुंद यांनी आपल्या ग्रंथांमध्ये नय या संकल्पनेचा विपुल प्रमाणात वापर केला आहे. द्रव्यार्थिक आणि पर्यायार्थिक नय हे नयाचे वर्गीकरण सर्वज्ञात आहे. कुंद्कुंदांनी देखील या दोन नयांचे वर्णन आपल्या ग्रंथांमधून केले आहे.

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

द्रव्यार्थिक नयाप्रमाणे वस्तू नित्य आहे आणि पर्यायार्थिक नयाप्रमाणे वस्तू उत्पाद आणि विनाश यांनी युक्त आहे. कुंद्कुंदांनी या दोन प्रकारच्या नयाबरोबर निश्चय व व्यवहार नय अशा आणखी दोन प्रकारच्या नयांचे वर्णन आपल्या ग्रंथांत केले आहे. कुंद्कुंद म्हणतात की निश्चय नयाप्रमाणे जीव मुक्त आहे आणि व्यवहार नयाप्रमाणे बद्ध आहे. कुंद्कुंदांनी पारंपारिक नयाच्या चौकटीबाहेर जाऊन एका नवीन प्रकारच्या नयाची संकल्पना मांडली. लेखाच्या दुसऱ्या भागात या संकल्पनांची विस्तृत मीमांसा केली आहे.

निश्चय व व्यवहार नय सापेक्ष आहेत, दोन्ही नय सारखे सत्य आहेत असे कुंद्कुंद मानतात. तसेच या दोन नायांमध्ये उपदेय-हेय असे भेद आहेत असे ते सांगतात. निश्चय नय श्रेष्ठ आहे, त्याचाच केवळ अवलंब करून साधकांना मोक्ष प्राप्त होतो. असे असले तरी कुंद्कुंदांनी काही प्रसंगी व्यवहार नयाची आवश्यकता मानली आहे. निश्चय आणि व्यवहार नयाचा वापर केल्यामुळे बंध आणि मोक्ष या संकल्पनांचा परीघ आणि परिमाण कसे बदलते याची मीमांसा लेखाच्या अंतिम भागात केली आहे. तसेच कुंद्कुंदांच्या विचारांचे नाविन्य आणि त्यांचे जैन तत्त्वज्ञानातील योगदान स्पष्ट करण्याचा प्रस्तुत निबंधात प्रयत्न केला आहे.

**जैन तत्त्वज्ञानातील नय:**

नय म्हणजे दृष्टीकोण. जैन दर्शनाप्रमाणे प्रत्येक वस्तू अनंतधर्मात्मक असते. अशी वस्तू जाणण्यासाठी असंख्य दृष्टीकोण असू शकतात. 'सत्' ची व्याख्या तत्त्वार्थसूत्रामध्ये (अध्याय ५, सूत्र ३०) आढळते. सत् म्हणजे जे नित्य आहे आणि जे उत्पाद व व्यय यांनी युक्त आहे. इथे प्रश्न उपस्थित होतो – सत् नित्य आहे की अनित्य? षड्द्रव्ये नित्य आहेत की अनित्य? वस्तू नित्य आणि अनित्य दोन्ही आहे असे जैन दर्शन मानते. असे मानायचे म्हणजे परस्परविरोधी विधाने मानवी लागतात – जे तर्कसुसंगत नाही. यासाठी नय संकल्पना वापरली जाते. प्रमेयकमलमार्तण्ड (पृ. ६७६) या ग्रंथामध्ये नयाची व्याख्या दिली आहे. विरोधकाचे किंवा प्रतिपक्षाचे खंडन न करता वस्तूचे अंशतः ग्रहण करणारा ज्ञात्याचा अभिप्राय म्हणजे नय.

यावरून हे लक्षात येते की नयामुळे होणारे ज्ञान हे आंशिक आहे. अनंतधर्मात्मक वस्तूच्या एका किंवा काही पैलूंचे ग्रहण करणारा नय हा अंशज्ञान प्राप्त करून देतो. वस्तूच्या असंख्य गुणांचे आणि पर्यायांचे वर्णन करण्यासाठी असंख्य नय असू शकतात. यांचे प्रामुख्याने दोन प्रकारच्या नयांमध्ये वर्गीकरण करतात – द्रव्यार्थिक नय आणि पर्यायार्थिक नय. द्रव्यार्थिक नय द्रव्याच्या नित्य स्वरूपावर किंवा सामान्य स्वरूपावर भर देणारा असतो तर पर्यायार्थिक नय द्रव्याच्या अनित्य किंवा विशिष्ट स्वरूपावर भर देतो. वरील उदाहरणाच्या संदर्भात द्रव्यार्थिक नयाप्रमाणे वस्तू नित्य आहे आणि पर्यायार्थिक नयाप्रमाणे अनित्य. नयाचा अवलंब केल्यामुळे वरील दोन विधानातील परस्पर विरोध मावळतो.

हे नयज्ञान तीन प्रकारच्या विधानातून मांडले जाते. स्याद्वादमंजरी (श्लोक २८) या ग्रंथामध्ये दुर्नय, नय व प्रमाण असे नयाचे तीन प्रकार दिले आहेत. 'सत् एव', वस्तू केवळ नित्य आहे असे म्हटले तर तो दुर्नय आहे, चुकीचा नय आहे. अनंतधर्मात्मक

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

वस्तूचे वर्णन करण्यासाठी नय किंवा दृष्टीकोण स्वीकारणं आवश्यक आहे. नयाच्या व्याख्येप्रमाणे दृष्टीकोण न स्वीकारता केलेले विधान किंवा इतर सर्व पर्यायांचे खंडन करून फक्त एकच विधान सत्य आहे असे मानणे बसत नाही. अशा एककल्ली विधानाला दुर्नय किंवा एकान्त म्हणतात. 'सत्', वस्तू नित्य आहे या विधानामध्ये 'वस्तू अनित्य आहे' अशा प्रकारच्या विरोधी विधानांचा अवच्छेद केला जात नाही. या विधानाला अंशज्ञान किंवा नयज्ञान असे म्हणतात. 'स्यात् सत्', स्यात् म्हणजे एका विशिष्ट प्रकारे, एका विशिष्ट दृष्टीकोणातून. कोणत्याही विधानाला स्यात् हा शब्द जोडला म्हणजे ते प्रमाणवाक्य होते. विविध दृष्टीकोण स्वीकारून केलेली सर्व प्रकारची विधाने ही प्रमाणवाक्ये असतात असे स्याद्वादमंजरीमध्ये म्हटले आहे. अशा प्रकारे दृष्टीकोण स्वीकारून केलेल्या विधानांना स्यात् शब्द जोडण्याच्या प्रक्रियेला स्यात्-वाद म्हणतात. हा स्याद्वाद सात प्रकारच्या विधानांद्वारे मांडता येतो. यालाच सप्तभंगी म्हणतात. सप्तभंगी म्हणजे सात प्रकारची विधाने. ती पुढीलप्रमाणे आहेत – स्यात् अस्ति, स्यात् नास्ति, स्यात् अस्ति च नास्ति च, स्यात् अवक्तव्यम्, स्यात् अस्ति च अवक्तव्यम् च, स्यात् नास्ति च अवक्तव्यम् च, स्यात् अस्ति च नास्ति च अवक्तव्यम् च.

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की दृष्टीकोण स्वीकारून केलेली सर्व प्रकारची विधाने ही नयज्ञान किंवा अंशज्ञान प्राप्त करून देतात. अशी सर्व विधाने ही परस्पर सापेक्ष असतात व सारखीच सत्य असतात. द्रव्यार्थिक नयाप्रमाणे वस्तू नित्य आहे हे विधान जितके सत्य आहे तितकेच पर्यायार्थिक नयाप्रमाणे वस्तू उत्पादव्यय युक्त आहे हे विधान सत्य आहे. अशा प्रकारे जैन दर्शनातील नय संकल्पना समजून घेतल्यानंतर आता आचार्य कुंदकुंद यांच्या नयाकडे वळू या.

**आचार्य कुंद्कुंद यांची नय संकल्पना:**

आचार्य कुंद्कुंद यांनी आपल्या ग्रंथांमध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणात नयाचा वापर केला आहे. प्रसिद्ध असलेल्या द्रव्यार्थिक व पर्यायार्थिक नयाचा वापर कुंद्कुंदांनी आपल्या पंचास्तिकायसार व प्रवचनसार या ग्रंथांत केला आहे.

षड्द्रव्यांचे वर्णन करण्यासाठी कुंद्कुंदांनी या नयांचा वापर केला. जीव द्रव्याचे वर्णन करताना जीव नित्य आहे किंवा अनित्य हे सांगण्यासाठी कुंद्कुंद पारंपारिक द्रव्यार्थिक-पर्यायार्थिक नय वापरतात. द्रव्यार्थिक नयाप्रमाणे जीव नित्य आहे. पर्यायार्थिक नयाप्रमाणे जीव देव, नारकी, तिर्यंच, मानुष या चार पैकी एका गतीमध्ये आहे.

कुंद्कुंदांनी निश्चय व व्यवहार नय या आणखी एका प्रकारच्या नयांचा उपयोग आपल्या ग्रंथांमध्ये आणि विशेषतः समयसार या ग्रंथामध्ये केला आहे. जीव हे जैन दर्शनातील नऊ तत्त्वांपैकी एक तत्त्व आहे. जीव, अजीव, आस्रव, पाप, पुण्य, बंध, संवर, निर्जरा आणि मोक्ष ही नऊ तत्त्वे जैन दर्शनाने मानली आहेत. जीव तत्त्वाचे वर्णन करताना कुंद्कुंद निश्चय व व्यवहार नय वापरतात. निश्चय नयाप्रमाणे जीव मुक्त आहे आणि व्यवहार नयाप्रमाणे तो बद्ध आहे. एकच जीव एकाच वेळी मुक्त व बद्ध दोन्ही आहे. जीव मुक्त आहे व बद्ध आहे ही दोन परस्परविरोधी विधाने दृष्टीकोण वापरल्यामुळे विरोधी होत नाहीत. एकच

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

जीव एकाच वेळी ज्याप्रमाणे नित्य व अनित्य दोन्ही असू शकतो तद्वतच तो मुक्त व बद्ध असतो. इथपर्यंत दोन्ही प्रकारच्या नयांमध्ये म्हणजेच द्रव्यार्थिक-पर्यायार्थिक नय व निश्चय-व्यवहार नय यांमध्ये साम्य आढळते. कुंदकुंदांचे निश्चय व व्यवहार नय हे अशा प्रकारे नयाच्या व्याख्येशी काही अंशी तरी सुसंगत आहेत.

पारंपारिक जैन दर्शनात नऊ तत्त्वांचे जे वर्णन सर्वज्ञात आहे त्याचे विवरण कुंदकुंदांनी आपल्या पंचास्तिकायसार या ग्रंथात केले आहे. जीव हा अनादि काळापासून बद्ध आहे. काया, वाचा, मन यांनी केलेल्या कृतीमुळे सूक्ष्म कर्मपुद्गलांचा आस्रव कषाय युक्त जीवास होतो आणि यालाच बंध म्हटले आहे. या कर्मसंचयाचा नाश करण्यासाठी संवर व निर्जरा ही दोन तत्त्वे सांगितली आहेत. कर्माचा आस्रव रोखणे याला संवर म्हणतात आणि साठलेली कर्म नष्ट होण्याच्या प्रक्रियेला निर्जरा म्हणतात. जैन दर्शनात बाह्य व आभ्यंतर तपाने निर्जरा साध्य होते. सर्व प्रकारच्या कर्मांचा नाश म्हणजे मोक्ष.

अशा प्रकारे बंध-मोक्षाचे वर्णन केल्यानंतर कुंदकुंद स्वतः या बंधप्रक्रियेवरच प्रश्नचिन्हं उत्पन्न करतात. प्रवचनसार या त्यांच्या ग्रंथामध्ये ते प्रश्न विचारतात: "अमूर्त जीव मूर्त कर्मपुद्गलामुळे कसा बद्ध होऊ शकतो? जीवाचा कर्माशी संयोग कसा होतो?" (प्रवचनसार, अध्याय २, गाथा ८१) त्याचे एका प्रकारे उत्तर कुंदकुंद समयसारामध्ये देतात. जीव हा तत्त्वतः बद्ध होऊच शकत नाही, केवळ व्यवहार नयाप्रमाणे जीव बद्ध आहे असे भासते. अशी धक्कादायक विधाने कुंदकुंद करतात. इतकेच नव्हे तर साधनेच्यासाठी निश्चय नय श्रेष्ठ आहे असे ही ते सांगतात.

अशा काही धाडशी विधानांमुळे बराच काळापर्यंत समयसार हा ग्रंथ सर्वसामान्य साधकांना अभ्यासायची परवानगी नव्हती. साधनेच्या अत्युच्च शिखरावर असलेलेच हा ग्रंथ अभ्यासू शकत होते. हा जैन श्रद्धेचा विषय असला तरी याचे कारण मात्र पटण्यासारखे आहे. कुंदकुंदांनी म्हटल्याप्रमाणे जीव मुक्त आहे असे निश्चयनयाचा अवलंब करून मानले तर मोक्षासाठी आचाराव्या लागणाऱ्या सर्व साधनांना मग काही अर्थ उरत नाही. जैन व्रते – सत्य, अहिंसा, इत्यादि पाळण्याची आवश्यकता राहणार नाही. असे झाले तर ते समाजासाठी घातक ठरेल. तेवढ्यासाठीच समयसार बारकाईने अभ्यासण्याची गरज आहे. वरवर वाचून चुकीचे अर्थ काढले तर त्याने सर्व जैन धर्म आणि दर्शन, बद्ध व मुक्त या संकल्पना धोक्यात येतात.म्हणून कुंदकुंदांनी नय ही संकल्पना वापरून जीव मुक्त आहे आणि बद्ध आहे ही सापेक्ष विधाने आहेत असे समयसारामध्ये विशद केले आहे. निश्चय नयाप्रमाणे जीव मुक्त आहे असे मानले तरी व्यवहार नयाप्रमाणे जीव बद्ध आहे हे विसरून चालणार नाही. तसे न केल्यास तो निश्चय नय न होता निश्चय एकान्त होईल. जीव मुक्त आहे असेच सर्व मानू लागतील आणि समस्त जैन साधनांना आणि समाजरचनेला धोका उत्पन्न होईल. यासाठीच कुंदकुंदांनी हे स्पष्ट केले आहे की जिथपर्यंत परमार्थाचे (म्हणजे जीव मुक्त आहे या वस्तुस्थितीचे) ज्ञान होत नाही तिथपर्यंत व्यवहार नय आवश्यक आहे. व्यवहार नयाप्रमाणे जीव बद्ध आहे आणि कर्म नष्ट करण्यासाठी विस्तृत व प्रदीर्घ काळ साधना, विविध प्रकारची व्रते, बाह्य व आभ्यंतर तपाचरण करावी लागतात.

ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

EIIRJ

Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

जोपर्यंत साधकाला परमार्थाची भाषा समजत नाही तोपर्यंत व्यवहाराच्या भाषेशिवाय गत्यंतर नसते. कुंदकुंद यासाठी एक उदाहरण देतात. ज्याप्रमाणे अनार्याला अनार्य भाषेमध्ये बोलल्याशिवाय समजत नाही त्याप्रमाणे अनादि काळापासून बद्ध अवस्था सतत अनुभवत असलेल्या जीवास व्यवहार नयाची भाषा वापरल्याशिवाय परमार्थाचा बोध होत नाही (समयसार, गाथा ८).

निश्चय व व्यवहार नय वापरून कुंदकुंदांनी अशा प्रकारे पारंपारिक जैन साधना व्यवहार नयामध्ये समाविष्ट केली आहे. पण कुंदकुंद एवढ्यावर थांबले नाहीत. निश्चय व व्यवहार नय परस्पर सापेक्ष जरी असले तरी निश्चय नयाचा वापर करूनच मुनींना मोक्ष प्राप्त होतो, व्यवहार नयामुळे नाही, असेही कुंदकुंद समयसारामध्ये ठामपणे म्हणतात (समयसार, गाथा १५१). निश्चय नयाप्रमाणे जीवाचे वर्णन कुंदकुंद करतात. जीव अबद्ध आहे, कर्माशी असंयुक्त आहे (कर्मरहित आहे), जीवस्थान, गुणस्थान, इत्यादींनी रहित आहे – हेच जीवाचे तत्त्वतः स्वरूप आहे. अज्ञान, कषाय, इत्यादींमुळे व्यवहार नयाप्रमाणे जीव अनादि काळापासून बद्ध आहे. कुंदकुंद म्हणतात की व्यवहार नय अभूतार्थ दर्शवतो तर निश्चय नय भूतार्थ. विवेकज्ञान रहित (प्रत्याख्यान ज्ञान रहित) जीव कर्म पुद्गलांशी तादात्म्य ठेवतो. "मी पुद्गलद्रव्य आहे आणि पुद्गलद्रव्ये माझी आहेत" असे मानतो. देहादि इंद्रिये यांना संयुक्त तसेच बाह्य वस्तू घर, नातेवाईक, इत्यादींना असंयुक्त पुद्गलद्रव्य म्हटले आहे. सर्व प्रकारच्या पुद्गलद्रव्यांशी (संयुक्त व असंयुक्त) तादात्म्य झालेल्या जीवास अप्रतिबुद्ध जीव म्हटले आहे (समयसार, गाथा १९-२३). प्रत्याख्यान ज्ञानाने इतर सर्व प्रकारची अजीव द्रव्ये ही परद्रव्ये आहेत हे जीवास समजते. प्रत्याख्यानाने जीव स्वतःस सर्व परद्रव्यापासून विलग करतो आणि आपल्या शुद्ध स्वरूपाचे ज्ञान प्राप्त करतो.

जीवाची बद्धावस्था अधिक स्पष्ट करण्यासाठी कुंदकुंद स्फटिकाचे उदाहरण वापरतात. शुद्ध स्फटिकाजवळ लाल रंगाचे फुल ठेवल्यास त्याचे प्रतिबिंब स्फटिकावर पडते, स्फटिक प्रत्यक्षात लाल रंगामुळे मलिन होत नाही, तो केवळ तसा झाल्यासारखा भासतो. तद्वतच जीव हा स्फटिकाप्रमाणे शुद्ध आहे. दोन अजीव द्रव्यांचा एकमेकांशी संबंध येऊ शकतो. जीव चैतन्य युक्त आहे, चैतन्य रहित पुद्गलाशी वास्तवात तो जोडला जाऊ शकणार नाही. केवळ कर्मपुद्गलांचे प्रतिबिंब शुद्ध जीवामध्ये पडून जीव मलिन झाल्यासारखा भासतो (समयसार, गाथा २७८-२७९). स्फटिकापासून रंगीत वस्तू दूर केली की स्फटिक पहिल्यासारखा होतो तद्वतच जीव प्रत्याख्यान ज्ञानाने स्वतःपासून परद्रव्ये दूर करतो. स्फटिका प्रमाणे जीवाचे शुद्ध स्वरूप आहे असे कुंदकुंद सांगतात.

निश्चय नयाप्रमाणे मोक्षमार्गाचे विवेचन समयसारात आढळते. आत्म्यावर ध्यान करणे, आत्मा हाच माझा संवर आहे, योग आहे, इत्यादि जाणणे अशी एक वेगळ्या प्रकारची साधना कुंदकुंद सांगतात. ज्याचा उल्लेख पारंपारिक जैन दर्शनामध्ये नाही. निश्चय नयाप्रमाणे आत्मा शुद्ध आहे असे मानून शुद्ध आत्म्यावर ध्यान करणे यावर कुंदकुंद विशेष भर देतात. तसेच आत्मज्ञान

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

होणे म्हणजेच मोक्षप्राप्ती असे कुंदकुंद मानतात. पारंपारिक जैन दर्शनात सर्व कर्मांचा क्षय म्हणजे मोक्ष. याव्यतिरिक्त तिथे आत्मज्ञानाचा उल्लेख नाही.

यावरून हे स्पष्ट होते की कुंदकुंद निश्चय नयावर आणि याला अनुसुरून आत्म्याचे ध्यान करण्याच्या साधनेवर विशेष भर देतात. नयामध्ये सापेक्षता असते, उपादेय-हेय भेद नसतात या पारंपारिक नयाच्या व्याख्येला कुंदकुंद छेद देतात. निश्चय नय श्रेष्ठ आहे व तो व्यवहार नयाचा बाध करतो असे कुंदकुंद सांगतात (समयसार, गाथा २७२).

इथे प्रश्न उपस्थित होतो की अशाप्रकारे निश्चय नयाकडे कुंदकुंदांचा कल जास्त आहे तर तो निश्चय नय कसा होणार? तो निश्चय एकान्त, दुर्नय म्हणजेच अप्रमाण होणार. एवढा मोठा सैद्धांतिक धोका कुंदकुंदांनी विशिष्ट हेतूसाठी पत्करला. पारंपारिक जैन साधना त्यांनी नाकारली नाही. पण त्यात आलेला यांत्रिकपणा त्यांना खटकला. त्यांच्या लक्षात आले की साधनेच्या बाह्य अवडंबरावरच भर वाढत चालला आहे आणि मूळ गाभा कुठेतरी हरवत चालला आहे. म्हणून त्यांनी निश्चय-व्यवहार नयामध्ये उपदेय-हेय हा संबंध प्रस्थापित करून आत्म्यावर ध्यान करणे हेच मोक्षाचे प्रमुख साधन मानले. तरी सामान्य साधकांस सुरुवातीला व्यवहार नयाप्रमाणे साधना करावी लागते. म्हणून व्यवहार नयाचे महत्त्वही त्यांनी स्पष्ट केले.

आणखी एका पद्धतीने नयाचे विवेचन समयसारामध्ये आढळते. कुंदकुंद म्हणतात: "निश्चय नयाप्रमाणे जीव मुक्त आहे व व्यवहार नयाप्रमाणे बद्ध आहे हे दोन नयपक्ष आहेत. जो साधक पक्षातिक्रांत होतो त्याला समयसार म्हटले आहे." (समयसार, गाथा १४२) अमृतचंद्र व जयसेन या दोन भाष्यकारांनी समयसारावरच्या आपल्या भाष्यात 'समयसार' या पारिभाषिक शब्दाचा अर्थ सांगितला आहे. समय म्हणजे जीव किंवा आत्मा आणि सार म्हणजे शुद्धावस्था. समयसार म्हणजे शुद्ध आत्मा. इथे कुंदकुंद मुक्तता व बद्धता या दोन्ही परस्पर सापेक्ष संकल्पना आहेत असे मानतात. तसेच शुद्ध जीव (समयसार) हा या दोन्ही संकल्पनांच्या आणि नयांच्या पलीकडे आहे हे दर्शवितात.

पारंपारिक नयाच्या परिभाषेत पक्षातिक्रांत ही संकल्पना समजणे कठीण जाते. दृष्टीकोण स्वीकारून अनंतधर्मात्मक वस्तूच्या विविध पैलूंचे अंशज्ञान होते. कर्मक्षय झाल्यानंतर जेव्हा केवलज्ञानाची प्राप्ति होते तेव्हा केवली सर्व वस्तूंचे भूत, भविष्य व वर्तमान तिन्ही काळातील सर्व गुण व पर्याय प्रत्यक्ष जाणतो. म्हणजेच केवलज्ञानामध्ये सर्व नयांनी जाणल्या जाणाऱ्या वस्तू एकदम जाणल्या जातात. पण इथे पक्षातिक्रांत होता येत नाही. कुंदकुंदांच्या तत्त्वज्ञानात मात्र नयाच्या पलीकडे जाता येते. नयांच्या पलीकडे गेल्यानंतरच अत्युच्च समयसाराची अवस्था प्राप्त होते.

**आचार्य कुंदकुंद यांचे जैन तत्त्वज्ञानातील योगदान:**

कुंदकुंदांच्या नाविन्यपूर्ण निश्चय आणि व्यवहार नयाच्या वर्णनामुळे मोक्ष आणि बंध या संकल्पना पूर्णपणे बदलतात. जीव हा तत्त्वतः मुक्तच आहे. तो बद्ध होऊ शकत नाही, बद्ध आहे असे केवळ भासते. निश्चय नयाप्रमाणे का होईना, पण जीव मुक्त आहे

असे मानणे हा एक मोठा क्रांतिकारी विचार कुंद्कुंदांनी मांडला. आत्म्यावर ध्यान हा निश्चय मोक्षमार्ग त्यांनी प्रखरपणे दाखवला. पण असे करत असताना त्यांनी पारंपारिक जैन तत्त्वज्ञानाचे पूर्णतः खंडन केले नाही. व्यवहार नयाची सत्यता आणि उपयोगिता त्यांनी काही अंशी मान्य केली.

कुंद्कुंद हे दिगंबर जैन आचार्य आहेत. श्वेतांबर व दिगंबर असे जैन समाजाचे दोन भाग झाल्यानंतर श्वेतांबर संप्रदायाने आगम ग्रंथ संपादित केले. दिगंबरांनी श्वेतांबरांचे आगम ग्रंथ मान्य केले नाहीत. अशा वेळी कुंद्कुंदांचे ग्रंथ दिगंबर संप्रदायामध्ये प्रमाणभूत ग्रंथ म्हणून मानले जाऊ लागले. कुंद्कुंदांना पारंपारिक जैन विचारांपासून पूर्ण फारकत घेणे

प्रशस्त वाटले नाही. त्यांनी काही अंशी पारंपारिक जैन विचारांची मांडणी आपल्या ग्रंथांमधून केली. तसेच त्याबद्दल काही मूलभूत प्रश्न उपस्थित करून निश्चय आणि व्यवहार नयाची आवश्यकता ध्वनित केली.

कुंद्कुंदांनी दिगंबर जैन संप्रदाय एकत्र आणून विकसित करण्याची जबाबदारी सांभाळली. ज्ञान आणि आध्यात्मिक अधिकारामुळे त्यांना आचार्य हे पद मिळाले. जैन उपासना, साधना, मोक्षमार्ग, व्रत, उपोषण पद्धति, अशा सर्व प्रकारच्या जैन धार्मिक रीतिरिवाजांचे महत्त्व कुंद्कुंदांनी नाकारले नाही. पण त्यातच अडकून राहिल्यास यांत्रिकता येते आणि मूळ तत्त्वाचा विसर पडतो. ती यांत्रिकता दूर करण्यासाठी त्यांनी निश्चय आणि व्यवहार नयाचा नाविन्यपूर्ण सिद्धांत मांडला. निश्चय नयाप्रमाणे जीव मुक्त आहे असे मानून ती मुक्तावस्था प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी कुंद्कुंदांनी शुद्ध आत्म्यावर ध्यान करणे हीच प्रमुख साधना वर्णिली. व्यवहार नयाप्रमाणे टप्प्याटप्प्याने प्रगती होते व चित्तशुद्धि होते. त्यानंतर साधक निश्चय नय समजण्याच्या योग्यतेचा होतो. आत्म्याचे ध्यान ही सूक्ष्म साधना त्यानंतर त्याला सहज शक्य होते.

अशी साधना करत करत साधकाला अंतिम अवस्थेत समयसाराची प्राप्ति होते. बद्ध आणि मुक्त या दोन्ही अवस्था सापेक्ष आहेत हे जाणून तो पक्षातिक्रांत किंवा नयातीत होतो. ही समयसाराची अवस्था सिद्धत्वाची परम अवस्था आहे असे कुंद्कुंद यांच्या तत्त्वज्ञानातून स्पष्ट होते आणि हेच त्यांचे योगदान होय.

**संदर्भ ग्रंथ:**


- उमास्वाति (२०००), *तत्त्वार्थसूत्र*, संघवी, सुखलाल (भाष्य), दीक्षित, के. के. (इंग्रजी भाष्यंतर), एल.डी. इन्स्टिट्यूट ऑफ इंडॉलोजी, गुजरात, द्वितीय संस्करण
- कुंद्कुंद आचार्य (१९८६), *पंचास्तिकायसार*, चक्रवर्ती, ए. (इंग्रजी भाष्यंतर), भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन, नवी दिल्ली, तृतीय संस्करण
- कुंद्कुंद आचार्य (१९८४), *प्रवचनसार*, उपाध्ये, ए.एन. (संपादन), श्री परमश्रुत प्रभावक मंडळ, आगास, गुजरात

➢ कुंदकुंद आचार्य (१९९७), *समयसार*, चक्रवर्ती, ए. (इंग्रजी भाष्यंतर), भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन, नवी दिल्ली, चतुर्थ संस्करण

➢ प्रभाचंद्र (१९९०), *प्रमेयकमलमार्तण्ड*, शास्त्री, महेंद्रकुमार (संपादन), श्री सत्-गुरु प्रकाशन, दिल्ली, तृतीय संस्करण


**Cite This Article:**

*** सुप्रिया चिं. देशमुख,** *(2022)* जैन तत्त्वनातील नय संकल्पना आणि आचार्य कुंदकुंद यांचे योगदान , ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No. XI (Special Issue-II), 48-55.*